**दिवाणी चौकशी अर्ज क्र.४०/२०२५**
**निशाणी क्र.१ खालील आदेश**

**MHRG190002692025**

**:: <u>दिवाणी चौकशी अर्ज क्र.४०/२०२५ मधील निशाणी क्र.१ खालील आदेश</u> ::**
**(राजेंद्र अनंत बागडे विरुध्द रमेश निळकंठ बागडे व इतर)**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२७, २२८, २३३, २३६, २३७, २४६ सह कलम १९० अन्वये सामनेवालांविरुध्द भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जदारातर्फे वकील श्री.आर.एम.जोशी यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला व निशाणी क्र.९ वरील लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले.

०३. अर्जदारातर्फे असे कथन की, सामनेवाला क्र.१ व २ सख्खे भाऊ, अर्जदार क्र.३ व ४ सख्ख्या बहिणी आहेत. सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदार व त्यांचे वडील कै.अनंत, आई–बहिणी यांचेविरुध्द नियमित दिवाणी दावा क्र.५८/२००७ हा दावा महाड न्यायालयात मनाई हुकूमासाठी दाखल केला होता. सदरच्या दाव्यात चुकीची वंशावळ नमुद करण्यात आली होती. कै.रामचंद्र विठ्ठल बागडे यांनी दोन लग्ने केलेली होती व वंशावळीत त्या दोन पत्नीचा उल्लेख न करता त्यांचे वंशज कै.अनंत, कै.निळकंठ व कै.मालतीबाई हे सख्खे भावंडे असे सदरहु वंशावळीत नमुद केलेले होते. वास्तविकतः कै.अनंत व कै.मालती ही सख्खी भावंडे होती परंतु त्यांची आई कै.पार्वतीबाई होती तर कै.निळकंठ यांची आई वेगळी होती.

कै.रामचंद्र विठ्ठल बागडे यांच्या दोन्ही पत्नी या कधीही एका घरात राहिलेल्या नाहीत. कै.निळकंठ व त्यांची आई या बिरवाडी येथील घर क्र.२६३ आणि २६४ तर कै.अनंत व त्यांची आई कै.पार्वतीबाई व बहिण कै.मालती हे बिरवाडी येथील घर क्र.२६८, २८९, २९० आणि २९१ मध्ये राहत होते.

०४. अर्जदारातर्फे पुढे असे कथन की, कै.रामचंद्र विठ्ठल बागडे यांनी दोन्ही पत्नी व त्यांचे मुलांना त्यांच्या मालकी वहिवाटीच्या मिळकती तोंडी वाटपाने दिल्या त्यांच्या हयातीतच कै.अनंत हे त्यांना प्राप्त झालेल्या मिळकती स्वतंत्रपणे वापरत होते. कै.अनंत व कै.निळकंठ हे जरी स्वतंत्र मुले असली तरी त्यांच्यात कधीही मालमत्तेवरुन भांडण तंटा नव्हता. कै.निळकंठ यांनी तोंडी वर्दीवरुन दिनांक २०.०२.१९६८ रोजी स्वतःची नावे सातबारावरुन कमी करुन दिली होती. कै.रामचंद्र हे दिनांक २५.०६.१९६४ रोजी मृत्यु पावले तर कै.निळकंठ हे दिनांक ०६.०२.१९९४ रोजी मृत्यु पावले. त्यानंतर केवळ १ महिना, ६ दिवसांनी कै.निळकंठ यांचे मुलांनी सामनेवाला क्र.१ व २ यांनी आर.टी.एस.अपील क्र.६/१९९४, फेरफार क्र.१६९७ मौजे काळीज, ता.महाड, जि.रायगड कै.निळकंठ यांनी दिनांक २०.०२.१९६८ मध्ये दिली होती व ती नोंद आव्हानित केली. त्यामध्ये कै.मालती फटाले व कै.अनंत यांना उत्तरार्थी म्हणुन सामील केले होते. त्या दोघांचे वकील एकच होते व त्या आर.टी.एस.अपिलात सामनेवाला क्र.१ व २ यांचे एकत्र कुटुंब असल्याचे कथन नव्हते. सदरहु प्रकरणात कै.लक्ष्मीबाईदेखील अपिलार्थी होती. सामनेवाला क्र.१ व २ यांनी मौजे वारंगी गावच्या मिळकतीसंदर्भात पण अपिल दाखल केले होते. त्यामध्ये कै.निळकंठ व कै.अनंत व कै.मालती यांचे एकत्र कुटुंब होते असा उल्लेख नाही.

०५. अर्जदारातर्फे पुढे असे कथन की, रे.मु.क्र.५८/२००७ केवळ मनाई हुकूमाकरिता असल्याने तो कायदयाने टिकणार नाही म्हणुन निशाणी क्र.१०८ कडे प्रतिवादी याने अर्ज दिला व सदरचा अर्ज प्रलंबित होता व त्यानंतर सामनेवाला क्र.५ ते ८ यांनी रे.मु.क्र.५३/२०२४ दाखल करुन त्यामध्ये सामनेवाला क्र.९ व १० यांना त्या दाव्यात प्रतिवादी क्र.९ व १० केले. रे.मु.क्र.५३/२०२४ आणि ५८/२००७ मधील पक्षकार व मिळकतीदेखील सारख्या होत्या. त्या कारणास्तव रे.मु.क्र.५३/२०२४ हा स्टे व्हायला हवा होता परंतु केला गेला नाही. दिनांक २०.०२.२०२५ रोजी रे.मु.क्र.५८/२००७ मधील वादींनी निशाणी क्र.११९ कडे पुरसिस दिल्याने सदरचा दावा निकाली झाला. वादी व प्रतिवादी यांची आई वेगळया आहेत. दोघांची राहती घरे वेगळी होती व आजसुध्दा कै.अनंत यांचे वारस घर क्र.२८९ व २९१ मध्ये तर कै.निलकंठ यांचे वारस घर क्र.२६३ व २६४ मध्ये राहत असल्याचे माहिती असतानासुध्दा हेतुपुर्वक खोटेपणाने उल्लेख केला नाही व न्यायप्रक्रियेत खोटेपणा केलेले आहे.

०६. अर्जदारातर्फे पुढे असे कथन की, सामेनवाला क्र.१ ते १० यांनी परस्पर संगनमत करुन रे.मु.नं.५८/२००७ आणि ५३/२०२४ दावे व मनाई अर्ज संगनमताने दाखल करुन अर्जदाराच्या मालमत्तेबद्दल खोटे दावे केले आहेत. सदरची मालमत्ता अर्जदारांच्या मालकीची आहे. त्यात कै.निलकंठ किंवा कै.मालती व त्यांच्या वारसांचा कोणत्याही हक्काने हितसंबंध नव्हता व नाही याची पुर्ण कल्पना असुन त्यासंबंधी न्यायालयीन निर्णयाची कागदपत्रे उपलब्ध असताना ते आदेश निर्णय यांचेविरुध्द भाष्य न करता लबाडीने ते आदेश लपवुन खोटे दावे केले व न्यायप्रक्रियेत ढवळाढवळ करुन खोटया कथनांव्दारे व प्रतिज्ञापत्राव्दारे मनाई व जैसे थे आदेश खोटेपणाने प्राप्त केले आहेत. सामनेवाला क्र.११ व १२ हे

रे.मु.क्र.५८/२००७ आणि ५३/२०२४ मध्ये सामनेवाला क्र.१ व २ यांचे वकील होते. दोन्ही दाव्यातील निशाणी क्र.५, स्टेटस्को अर्ज आणि प्रतिज्ञापत्र ड्राफ्ट केली होती.

०७. अर्जदारातर्फे पुढे असे कथन की, सामनेवाला क्र.१३ व १४ हे रे.मु.क्र.५८/२००७ आणि ५३/२०२४ मध्ये सामनेवाला क्र.५ ते ८ यांचेतर्फे वकील होते. सामनेवाला क्र.१४ यांनी दोन्ही दाव्यातील सामनेवाला क्र.५ ते ८ तर्फे लेखी म्हणणे, प्रतिज्ञापत्रे, निशाणी क्र.५ चे म्हणणे, जैसे थे परिस्थितीचा अर्ज व प्रतिज्ञापत्रे केली होती. सामनेवाला क्र.११ ते १४ वकील असुन कायदयाप्रमाणे न्यायालयाप्रती न्यायदानाचे कामात सत्य व ख–या गोष्टी कथन करुन न्याय प्राप्त करणे हे महत्वाचे कर्तव्य होते परंतु त्यांनी कर्तव्य न बजावता सामनेवाला क्र.१ ते १० यांचे काम करत असताना अनेक ठिकाणी खोटी व असत्य कथने करुन, जाणुन–बुजुन हेतुपुर्वक न्यायालयाच्या कामकाजात खोटेपणा करुन त्या खोटया कथनांचे आधारे न्यायालयाला विसंबुन राहायला लावुन त्यांचे आशिलाचे लाभात गैरमार्गाने व अनुचित प्रकारे आदेश प्राप्त केले आहेत. वास्तविकतः सामनेवाला यांच्यातील जुने दावे, त्यांचे निर्णय, सातबारा उतारे, फेरफार, रेव्हीन्यु कोर्टाचे निर्णय, इ.सर्व कागदपत्रांचे अवलोकन करुन हेतुपुर्वक खोटी विधाने करुन न्यायालयात ख–या गोष्टी लपवल्या होत्या. स्वतःच्या वकील बुध्दीचा न्यायदानात चुकीचा वापर करुन सामनेवाला क्र.१ ते १४ यांना त्यांच्या गैरकृत्यात साथ देऊन, संगनमत करुन न्यायालयात खोटी विधाने केली आहेत.

०८. अर्जदारातर्फे पुढे असे कथन की, सामनेवाला यांनी तब्बल १४ वर्षे अर्जदाराविरुध्द खोटेपणाने प्राप्त केलेला मनाई आदेश व त्यानंतर जैसे थे

परिस्थितीचा आदेश दिनांक २१.०१.२०२५ रोजी निशाणी क्र.३४ व ४१ मुळे अर्जदाराचे फार मोठे नुकसान झाले परंतु त्यांचे नातेवाईक, समाज, गावात, न्यायालयात, वकील वर्गात मोठी चर्चा सुरु झाली आहे व न्यायदानाचे कामात खोटेपणा केला तरी चालु शकते अशी खोटी विधाने केली तर अनुकुल निकाल प्राप्त करता येऊ शकतो ही भावना लोकांच्या मनात पसरलेली आहेत. सामनेवाला यांना त्यांचा खोटेपणा समजुनसुध्दा ते वारंवार असत्य, विधाने, प्रतिज्ञापत्र करत आहेत. सामनेवाला त्यांच्या बुध्दीचातुर्याच्या गोष्टी लोकांना सांगुन 'आम्ही फक्त त्रास देण्यासाठी दावा दिला आहे, आम्हाला काही मिळणार नाही हे माहिती आहे' असे बोलुन न्यायव्यवस्थेची थट्टा करीत असल्यामुळे नवोदित अगर सर्व वकील, पक्षकार प्रोत्साहन घेऊन न्यायालयात खोटेपणा करतील व ते रोखण्याकरिता सामनेवालाविरुध्द तक्रार होणे हिताचे आहे. खोटी विधाने, पुरावा, प्रतिज्ञापत्र करुन पुर्वीचे न्यायालयाचे निर्णय व त्यांनी केलेली विधाने व नवीन दाव्यातील पुर्णपणे भिन्न विधाने करुन त्यांनी न्यायदानाचे पवित्र कामात खोटेपणा केला आहे. समाजात न्यायालयाबाबत आदर व भिती सामनेवालाने केलेल्या खोटेपणामुळे निघुन गेली आहे व त्यामुळे न्यायदानाचे कामात यापुढेसुध्दा केवळ सामेनवाला नाही तर न्यायालयात येणारा प्रत्येक नागरिक खोटेपणा करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. न्यायालयात केवळ ख–या गोष्टींना थारा आहे, खोटया गोष्टींना नाही असा संदेश जाण्याकरिता सामनेवालाविरुध्द कारवाई होणे न्यायसंस्थेच्या हिताचे रक्षण होण्याकरिता आवश्यक आहे अन्यथा न्यायालयाचा कोणीही मान भविष्यात राखला जाणार नाही.

०९. अर्जदारातर्फे पुढे असे कथन की, सर्व सामनेवाला यांनी न्यायालयात खोटा पुरावा, खोटया पध्दतीने रचना करुन खोटी कथने केली. त्यांनी केलेली कथने खोटी आहेत हे माहिती असुन त्या कथनांचा वापर न्यायालयात दाव्यामध्ये करुन

अर्जदाराच्या मालकीच्या जागेवर खोटा दावा केला, खोटी स्टेटमेंट दिली व न्यायालयास त्यावर विसंबुन राहण्यास लावुन अनुकुल मनाई व जैसे थे परिस्थितीचे आदेश आले लाभात करुन घेतले. सामनेवाला यांचेविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३, मधील कलम २२७, २२८, २३३, २३६, २३७, २४६ सह कलम १९० अन्वये गुन्हा केला आहे व मा.न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल न्यायालयाचे सहाय्यक अधिक्षक अथवा योग्य कर्मचारी यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याबाबतचे आदेश होणेबाबत विनंती केली आहे.

१०. अर्जदारतर्फे निशाणी क्र.९ वरील लेखी युक्तीवादात असे नमुद केले आहे की, अर्जदारतर्फे वकीलांनी कलम ३७९ मधील तरतुदींनुसार मा.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांना संबंधितांविरुध्द तक्रार देण्याचे अधिकार आहेत. मा.न्यायालयात खोटे प्रतिज्ञापत्र, वस्तुस्थिती हेतुपुर्वक लपवुन, खोटी कथने करुन, खोटा पुरावा व प्रतिज्ञापत्र देऊन जुने न्यायनिर्णय लपविणे अशी फौजदारी गुन्हयाची कृत्ये आहेत व वकीलांनी ते करणे म्हणजे न्यायालयासमोर त्यांचे कोर्ट अधिकारी म्हणुन कर्तव्य न बजावणे व न्यायालयाची फसवणुक करणे होय. वादी व प्रतिवादी व त्यांचे वकीलांनी खोटी कथने, प्रतिज्ञापत्रे करुन चुकीची वंशावळ दिली, रे.मु.क्र. ४९/१९९९ चा निर्णय लपविला. त्याबद्दलची सर्व कागदपत्रे व त्या हुकुमनाम्याची प्रत रे.मु.क्र.५८/२००७ मध्ये दाखल केली. कै.अनंत व कै.निलकंठ यांची दोन वेगळी घरे आहेत हे दाखल घरपट्टी उता–यावरुन सिध्द होते. प्रस्तुत अर्जातील अनु.क्र.५४ व ५५ कडे जुन्या आरटीएस अपीलांमध्ये मालती वादींची आई व कै.अनंत हे बहिण–भाऊ सामनेवाला आहेत, वकील एकच आहेत. सदरहु आरटीएस अपीलामध्ये मालती हिने रमेश व कै.हेमचंद हे एकत्र कुटुंबाचा भाग आहेत असे कथन केलेले नाही. सदरची अपीले १९९४ मधील आहेत. बिरवाडी येथील मिळकती

गावठाण/एन.ए. असुन त्या शेत जमिनी म्हणुन खोटेपणाने उल्लेखलेल्या होत्या. प्रस्तुत अर्जातील अनु.क्र.१९ कडे श्री.रमेश याने त्यांची तसेच अन्य सर्व पक्षकारांची तोंडी पुराव्याची प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत. सर्व कागदपत्रे दाव्यामधील सही शिक्कयाच्या नकला आहेत व त्या कागदपत्रांचे आधारे वादी प्रतिवादींनी मनाई आदेश रे.मु.नं.५८/२००७ व जैसे थे परिस्थिती आदेश रे.मु.नं.५३/२०२४ मध्ये घेऊन १० वर्षपिक्षा जास्त खोटया कागदपत्रांच्या आधारे, खोटया कथनाव्दारे, प्रस्थापित कायदा व जुना हुकूमनामा लपवुन ते आदेश प्राप्त केल्याने सर्वानी गुन्हा केल्याबद्दल सकृतदर्शनी केस आहे.

११. अर्जदारतर्फे वकीलांनी पुढे असा युक्तीवाद केला की, वकीलांचे कार्य पक्षकारांकरिता असते व त्याच्या माहितीवरुन कोणतीही कथने केली तर त्याला जबाबदार वकील नसुन पक्षकार असतो परंतु जर वकीलांनी चुकीची कागदपत्रे बघुन कोणतीही कथने केली व ती चुकीची असली तर त्या गोष्टीला पक्षकार जबाबदार नसतो, ते दोघेही जबाबदार ठरतात. वकीलांना कायदयाच्या तरतुदी माहिती असतात हे गृहित धरले जाते व त्या क्षेत्रामध्ये तज्ञ आहेत असे गृहित धरले जाते. रे.मु.क्र. ४९/१९९४ मधील हुकूमनामा व तडजोड पुरसिस सर्व वकीलांनी रे.मु.क्र. ५३/२०२४ देण्याअगोदार व त्या दाव्यात प्रतिदावा देताना पाहिली होती. रे.मु.क्र. ५८/२००७ मधील अर्जदाराची लेखी कैफियत पाहिली होती, सादर केलेली कागदपत्रे माहिती होती. त्या दाव्यात अर्जदाराने स्पष्ट केले होते की, कै.अनंत व कै.मालती हे भाऊ–बहिण आहेत. त्यांची आई एक आहे. मात्र कै.निलकंठ यांचे एकत्र कुटुंब नव्हते. ते दोन वेगळया घरात राहत होते व वंशावळ चुकीची आहे. कै.मालती हिने तिच्या वडिलार्जित मिळकतीपासुन तिचा सर्व हिस्सा कै.अनंत यांच्या लाभात तडजोडीने सोडला आहे. या सर्व गोष्टीची कल्पना सर्वाना असुन परत

रे.मु.नं.५३/२००२४ मध्ये तीच खोटी वंशावळ दिली. एकत्र कुटुंब आहे असे खोटेपणाने म्हणणे, वारसा हक्क सोडले असुन अजुन हक्क आहेत असे कथन करुन वाटप मागितले. कोर्टाचा हुकुमनामा असुन त्यावर कोणतेही अपील नसुन तो निर्णय फायनल झाला होता तरी पक्षकारांनी व वकीलांनी खोटेपणाने ती बाब माहिती असुन लपवली म्हणुन सर्वजण त्या खोटेपणाबद्दल शिक्षेस पात्र आहेत. किमान वकीलांनी तरी त्या हुकुमनाम्याविरुध्द काहीतरी कारण लिहिणे बंधनकारक होते. उदा. कै.मालतीला फसवुन, धमकी देवुन तडजोड घडवुन आणली, तिची मानसिक स्थिती ठिक नव्हती व त्या कारणांमुळे तो हुकुमनामा त्यांचेवर बंधनकारक नव्हता व नाही. वकीलांना ते वकील असल्यामुळे काहीही कथन करणे, कायदेशीर  तरतुदीच्या विरोधात जावुन, खोटे विधान करुन त्याबद्दल वकीलांना चुक झाल्याचा बचाव घेता येणार नाही. पक्षकाराने काहीही माहिती दिली तरी ती कायदयाच्या चौकटीत बसुन असली तरच तसे दाव्यात कथन करणे आवश्यक होते. कायदेशीर निर्णय झालेला असताना त्याच्या विरुध्द जावुन अगर तो निर्णय मा.न्यायालयापासुन लपवुन ठेऊन, त्या निर्णयाविरुध्द कथन करणे म्हणजे 'खोटे विधान' न्यायालयापासुन वस्तुस्थिती लपवणे कोर्टाला फसवणे या सदरात येते.

१२.  अर्जदार यांचे वकीलांनी अर्जास बळकटी येण्याकरिता खालीलप्रमाणे न्यायनिवाडे दाखल केले.

i. **<u>मे.न्यु इरा फॅब्रिक लि. विरुध्द भानुमती जव्हेरी निकाल ता.०३.०३.२०२० (स्पे.लिव्ह पिटीशन (दिवाणी) क्र.३३०९/२०१८ मा.सर्वोच्च न्यायालय</u>**.

सदर प्रकरणामध्ये रिस्पोडंट यांनी लघुवाद न्यायालय, मुंबई येथे भाडेकरुविरुध्द (New Era Fabrics Ltd.) बेदखलीचा दावा दाखल केला. वादाचा

मुख्य मुद्दा असा होता की, कंपनीचे पेड–अप–शेअर कॅपीटल रक्कम रुपये एक कोटीपेक्षा जास्त आहे का ? कंपनीने असा दावा केला की, तिने शेअर–बाय–बॅक करुन आपले भांडवल रक्कम रुपये एक कोटीखाली आणले आहे. हा दावा सिध्द करण्यासाठी कंपनीने मा.सर्वोच्च न्यायालयात ताळेबंद सादर केली. ट्रायल कोर्टाच्या नोंदीवरील ताळेबंद आणि मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले ताळेबंदमध्ये हाताने केलेले बदल आढळुन आले. विशेषतः इक्वीटी शेअर्स, अर्नींग पर शेअर यामध्ये विसंगती होती. त्यामुळे न्यायालयाची दिशाभुल करण्यासाठी बनावट पुरावा सादर केल्याचा आरोप करण्यात आला. रिस्पोडंट यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० व १९५(१)(ब) अंतर्गत अर्ज दाखल केला. कंपनी व तिच्या संचालकाविरुध्द खोटी साक्ष/बनावट पुरावा या गुन्हयांसाठी फौजदारी कारवाई सुरु करावी अशी विनंती केली.

१३.    मा.सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये फेरफार करुन न्यायालयाची दिशाभुल केल्याचा प्रथमदर्शनी गुन्हा झाला आहे का, आणि न्यायाच्या हितासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० अंतर्गत तक्रार दाखल करणे आवश्यक आहे का ? असे प्रश्न निर्माण झाले. यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण केले की, ट्रायल कोर्टामधील मूळ कागदपत्रे आणि मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेली कागदपत्रे यांची तुलना करण्यात आली. मा.सर्वोच्च न्यायालयासमोर सादर केलेल्या ताळेबंदमध्ये हाताने बदल करण्यात आले असल्याचे स्पष्ट दिसून आले. हे बदल मुद्दाम व जाणीवपुर्वक केलेले असुन न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असल्याचे आढळले. कंपनीच्या संचालकाने अशा कागदपत्रांवर प्रतिज्ञापत्र दिले ही बाबही गंभीर मानली. अंतरिम अर्ज मंजूर करण्यात आला. मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवले की, प्रथमदर्शनी खोटी साक्ष व बनावट पुरावा सादर केल्याचा

गुन्हा बनतो. त्यामुळे भारतीय दंड विधान कलम १९३ व १९९ अंतर्गत कंपनी व तिच्या संचालकाविरुध्द फौजदारी तक्रार दाखल करण्याचे आदेश दिले. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सेक्रेटरी जनरल यांना सक्षम दंडाधिका–याकडे तक्रार दाखल करण्याचे निर्देश दिले.

ii. <u>प्रितेश तायडे वि. महाराष्ट्र राज्य व इतर, दिनांक ०७ डिसेंबर २००० मा.मुंबई उच्च न्यायालय.</u>

१४. सदरहु प्रकरणात मुळ न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान संबंधित पक्षाकडुन खोटी साक्ष/खोटे प्रतिज्ञापत्र/दिशाभूल करणारे विधान दिल्याचा आरोप होता. त्याआधारे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० अंतर्गत कारवाई सुरु करण्याचा प्रश्न निर्माण झाला. खालच्या न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० अंतर्गत आदेश दिला/नकार दिला (परिस्थितीनुसार), त्याविरुध्द प्रकरण उच्च न्यायालयात आले. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० अंतर्गत कारवाई आपोआप करावी का ?, २. प्रत्येक खोटया विधानासाठी फौजदारी तक्रार दाखल करणे आवश्यक आहे का ?आणि ३."न्यायाचे हित" हा कस कसा लावायचा ? असा प्रश्न निर्माण झाला होता. मा.उच्च न्यायालयाने असे निरीक्षण केले की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० ही दंडात्मक तरतुद असून ती अपवादात्मक स्वरुपात वापरायची आहे. केवळ साक्ष खोटी आहे असे वाटल्यानेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० अंतर्गत कारवाई करणे बंधनकारक नाही. न्यायालयाने हे पाहणे आवश्यक आहे की, खोटे विधान जाणीवपुर्वक केले आहे का, आणि न्यायाच्या हितासाठी फौजदारी कारवाई करणे आवश्यक आहे का, न्यायालयाने विवेकाधिकार वापरणे अत्यावश्यक आहे. मा.उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० अंतर्गत कारवाई ही यांत्रीक पध्दतीने करता येत नाही. प्रत्येक

प्रकरणात प्राथमिक समाधान, न्यायाच्या हिताचा विचार, कारवाईची गरज, याचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे खालच्या न्यायालयाचा आदेश योग्य/अयोग्य ठरवुन आवश्यक निर्देश देण्यात आले. खोटी साक्षीची कारवाई ही सूडबुध्दीने किंवा दबावासाठी वापरु नये. न्यायाचे हितासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० चा आत्मा आहे. न्यायालयीन प्रक्रियेची पवित्रता राखण्यासाठीच ही तरतुद आहे. पक्षकारांना धाक दाखविण्यासाठी नव्हे.

iii. ***मेसर्स के.जी. मार्केटींग इंडिया वि. राशी संतोष सोनी आणि इतर दिनांक २३ ऑगस्ट २००२४ आरएफए (ओएस) (सीओएमएम) 16/2024–दिल्ली उच्च न्यायालय, (Division Bench)***

१५. सदर प्रकरणात के.जी. मार्केटींग इंडिया अपिलार्थीने CS (COMM) No.18/2023 मध्ये तावडा व सुर्या ट्रेडमार्क विषयक निषेधासाठी दावा दाखल केला. दावा सादर करताना कपंनीने काही प्रसिध्द जाहिराती पुराव्यांविषयी दाखविल्या ज्यावरुन तिचे ट्रेंडमार्क वापराचे अधिकार असल्याचे म्हटले. प्रतिस्पर्धानी त्यांना प्रतिदावा दाखल केला व म्हटले की, हे प्रसिध्द जाहीराती बनावट आहेत. रेस्पॉडंट यांनी खरे मुळ वर्तमानपत्र दाखवले ज्यावरुन स्पष्ट झाले की, अपिलार्थीच्या दाखल जाहिरात तोडमोड करुन तयार करण्यात आली होती. ही जाहीरात अपिलार्थीने ने दिवाणी दाव्यामध्ये पुरावा म्हणुन दाखल केला होता. अपिलार्थीने त्यावर सत्यविधान न्यायालयामध्ये सादर केले, पण तेही खोटे होते.

१६. रिस्पोडंटने फौजदारी चौकशी अर्ज क्र.१८४३२/२०२३ अंतर्गत अर्ज दाखल केला, यात अपिलार्थीवर आरोप केला की त्यांनी न्यायालयामध्ये खोटी कागदपत्रे आणि चुकीची विधाने सादर केली आहेत, ज्यामुळे गुन्हे घडले आहेत.

भारतीय दंड विधान कलम १९६, १९९, २००, २०९, ४६३, ४६५, ४६८ आणि ४७० आणि फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० अंतर्गत कारवाई आवश्यक आहे. बनावटीकरण दावा दाखल करण्यापुर्वी झाले होते त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० लागु होत नाही, कारण त्या खोटया कागदपत्रांचा वापर प्रकरणाच्या बाहेर तयार झाला होता. अपिलार्थीला आदेश ६ नियम १५अ अन्वये सत्यकथन दाखल करणे आवश्यक होते.

१७. सदर न्यायनिर्णयामध्ये मा.न्यायालयाने स्पष्ट केले की, जरी बनावटीकरण केलेली कागगदपत्रे पुर्वी तयार झाली असली तरी, ते न्यायालयीन कागदपत्रांमध्ये दाखल झाली असल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० अंतर्गत कारवाई करु शकते. सत्यविधान खोटे सादर केले हेही गंभीर आहे आणि त्यावरही प्रतिबध्दता आहे. अपिलार्थीने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या इक्बालसिंग मारवाह व अशोक गुलाबराव बोंद्रे या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे. ज्यामध्ये प्राथमिकदृष्टया मिसप्लेस् आहे असे न्यायालयाने सांगितले. त्यामुळे डिव्हीजन बेन्चने सदरचा न्यायनिर्णय स्टॅन्डींग ठेवला आणि रक्कम रु.२,००,०००/- कॉस्ट अपिलार्थी यांना करुन अपील खारीज केले.

iv. ***मे.बांदेकर ब्रदर्स वि. प्रसाद केणी, मा.सर्वोच्च न्यायालय, दिनांक ०२.०९.२०२० फौजदारी अपील क्र.५४६-५५०/२०१७.***

१८. सदरहु न्यायनिर्णयात मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केले आहे की, संचालकाची जबाबदारी आपोआप ठरत नाही. निगोशिएबल इन्ट्रुमेंटस् कायदा कलम १३८ अंतर्गत कंपनीविरुध्द खटला दाखल झाला तरी, निगोशिएबल इन्ट्रुमेंटस् कायदा कलम १४१ नुसार संचालक किंवा अधिका-यावर फौजदारी जबाबदारी

आपोआप येत नाही. तक्रारीत ठोस व स्पष्ट आरोप आवश्यक असतात. संचालकाविरुध्द कारवाई करण्यासाठी तक्रारीत स्पष्टपणे नमुद असणे आवश्यक आहे की, गुन्हा घडताना तो संचालक कंपनीच्या दैनंदिन कारभाराचा प्रभारी होता आणि व्यवहाराच्या निर्णयात सक्रीय होता. केवळ तो संचालक आहे असे नमूद करणे पुरेसे नाही. जर तक्रारीत निगोशिएबल इन्ट्रुमेंटस् कायदा कलम १४१ मधील आवश्यक घटक नमुद नसतील, तर अशा संचालकाविरुध्दची फौजदारी कार्यवाही कायदयाच्या प्रक्रियेचा गैरवापर ठरते आणि ती रद्द केली जाऊ शकते.

v. ***एन.ईश्वरनाथन वि. शासनातर्फे पोलीस अधिक्षक स्पेशल फौजदारी डायरी नं.55057/2024*** मा.सर्वोच्च न्यायालय.

१९. सदर प्रकरणात एन.एस्वरणाथन हा सत्र न्यायालयाचे खटल्यात दोषी ठरवण्यात आला होता आणि त्याचे अपील हायकोर्टात रद्द झाले. त्याबरोबर त्याने पहिला SLP(Cri.) दाखल केला जो २९ एप्रिल २०२४ रोजी नाकारला गेला आणि त्याला दोन आठवडयात आत्मसमर्पण करण्याचे आदेश देण्यात आले. त्याने आत्मसमर्पण न करता, दुसरा SLP (Diary No.55057/2024) नोव्हेंबर २०२४ मध्ये त्याच मा.उच्च न्यायालयाचे निर्णयावर पुन्हा दाखल केला. मा.सर्वोच्च न्यायालयाने सदर **एसएलपी*(क्रि.) डायरी क्र. ५५०५७/२०२४*** नाकारली. खटल्याच्या रेकॉर्डमध्ये दुय्यम SLP व त्यात मिळवलेल्या चुका याबद्दल गंभीर तक्रार नोंदवण्यात आली होती. विधिज्ञ/पक्षकाराव्दारे चुकीचा किंवा खोटा SLP दाखल केल्याबद्दल मा.सर्वोच्च न्यायालयाने एथिक्स, न्यायाचा अपप्रयोग करणे, आणि अवमानाबाबतीत गंभीर संदेश दिला आहे आणि केवळ माफी दाखल केल्याने शिक्षेपासुन सुटका होणार नाही, याचा विचार करावा असा निर्देश दिला आहे.

दिनांक १६.१२.२०२५

२०. केस फाईलची पडताळणी केली. अर्जदारतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. अर्जदारातर्फे निशाणी क्र.४ सोबत दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. अर्जदाराने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ३७९ प्रमाणे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२७, २२८, २३३, २३६, २३७, २४६ सह १९० प्रमाणे सामनेवाला यांच्यावर गुन्हा दाखल करणेबद्दल विनंती अर्ज दिलेला आहे. प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर, अर्जदारतर्फे वकीलांनी पुरसिस निशाणी क्र.०६ दाखल करुन सामनेवाला क्र.२ मयत असुन त्यांना प्रस्तुत अर्जातुन वगळण्याबाबत विनंती केली आहे. सबब, सामनेवाला क्र.२ विरुध्द कोणताही आदेश पारीत करणे उचित नाही. अर्जातील आरोप प्रत्यारोपांचे अवलोकन करता पुढील कोणताही आदेश करण्यापुर्वी सामनेवाला यांचे म्हणणे याकामी ऐकुन घेऊनच अंतिम आदेश करणे उचित होईल. याकारणास्तव, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## :: <u>आदेश</u> ::

सामनेवाला क्र.१, ३ ते १४ यांना प्रस्तुत अर्जाचेकामी म्हणणे देण्याकरिता नोटीसा काढण्यात याव्यात.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.12.16 18:21:08 +0530

महाड
दिनांक १६.१२.२०२५

**(श्रीमती एच. आर. जाधव)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, महाड

दिनांक १६.१२.२०२५